## कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी येथे 'शेळीपालन व्यवसाय व्यवस्थापन' प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न!

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व पशुपालकांना आधुनिक, तंत्रज्ञानयुक्त आणि अधिक फायदेशीर शेळीपालनाचे धडे देण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी,जि. नांदेड येथे दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. महेश अंभोरे (पशुवैद्यक तज्ञ) यांनी आयोजित केले होते.

**प्रमुख मार्गदर्शक**
डॉ. रोहित धुमाळ
पशुधन विकास अधिकारी, धर्माबाद

**प्रशिक्षणामधील प्रमुख आकर्षणे व विषय:**
✅ आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शास्त्रीय गोठा व्यवस्थापन, चारा नियोजन आणि शेळ्यांच्या आरोग्याची काळजी.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी शेतकरी बंधूंना कृषि विज्ञान केंद्र पोखर्णीच्या प्रा. माणिक कल्याणकर (पिक संरक्षण तज्ञ ), डॉ. महेश अंभोरे (पशु वैद्यक तज्ञ ), डॉ. अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) तसेच श्री. राजीव इंगोले यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेळीपालन व्यवसाय अधिक नफादायक बनवण्यासाठी कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड -१
नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे!












शेळी व मेंढीपालन:
आधुनिक व्यवसायाचा आराखडा
Krishi Vigyan Kendra
कृषि विज्ञान केंद्र




